# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

2. (Signature) ____________________________

   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ..............................................

(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.________________________________

(In words)

| D | 3 | 8 | 1 | 2 |
|---|---|---|---|---|

Time : 2 $^1/_2$ hours] [Maximum Marks : **150**

Number of Pages in this Booklet : **12**

Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and Original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There is no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण** : Ⓐ Ⓑ ● Ⓓ
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें । हालांकि आप परीक्षा समाप्ति पर OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई अंक काटे नहीं जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – III
## प्रश्नपत्रिका – III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are compulsory.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले 75 **(पंचाहत्तर)** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2) गुण** आहेत. **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

**1.** "वानरेयां येथिचीं चरित्रें आठवीजेतिः आइकीजेतिः उच्चारीजेतिः तेंही एक स्मरणचि कीं गा" असे कोणी कोणाला म्हटले ?

(A) महदंबेने केसोबासाला

(B) चक्रधरांनी म्हाइंभटाला

(C) गोविंदप्रभूंनी नागदेवाचार्याला

(D) बाईदेव व्यासांनी भास्करभट्टाला

**2.** ज्ञानेश्वर एक की दोन ? हा वाद कोणामध्ये झाला ?

(A) ल.रा. पांगारकर – स.के. नेऊरगावकर

(B) बा.अ. भिडे - नानामहाराज साखरे

(C) भारदेबुवा – भिंगारकरबुवा

(D) जोगमहाराज - रा.द. रानडे

**3.** वारियाने कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले ।
राधा पाहुनि भुलले हरी । बैल दुभे नंदाधरी ।।
या पंक्ती कोणाच्या ?

(A) रामजोशी

(B) होनाजी बाळा

(C) नामदेव

(D) एकनाथ

**4.** 'उठ झाला प्रातःकाळ तुझे गोपाळ आले घननीळा' ही भूपाळी कोणी लिहिली ?

(A) होनाजी बाळा

(B) रामजोशी

(C) परशराम

(D) प्रभाकर

**5.** 'शिवदिग्विजय' ही बखर कोणी लिहिली ?

(A) खंडो बल्लाळ चिटणीस

(B) मल्हार रामराव चिटणीस

(C) बाबूराव चिटणीस

(D) दत्ताजी त्रिमल वाकेनवीस

**6.** भागवताच्या दशमस्कंधावरची टीका कोणती ?

(A) हरिविजय

(B) हरिहर विलास

(C) हरिवरदा

(D) हरिपाठ

**7.** कुणि जाल का सांगाल का सुचवाल का ह्या कोकिळा रात्री तरी गाऊ नको खुलवू नको अपुला गळा या पंक्ती पुढीलपैकी कोणत्या कवीच्या आहेत ?

(A) मंगेश पाडगावकर

(B) शंकर वैद्य

(C) मनमोहन

(D) अनिल

8. काव्यकृती व काव्यरचना प्रकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अभागी कमल | i. | नाट्यकाव्य |
| b. | रंग पांचालिक | ii. | जानपदगीत |
| c. | सुगी | iii. | महाकाव्य |
| d. | कमला | iv. | खंडकाव्य |
| | | v. | भावकविता |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | iv | iii | ii |
| (B) | iv | i | ii | iii |
| (C) | iii | ii | iv | i |
| (D) | ii | v | i | iv |

9. पुढीलपैकी कोणते नाटक विजय तेंडुलकर यांनी लिहिले नाही ?

(A) गृहस्थ
(B) सूर्यास्त
(C) बेबी
(D) श्रीमंत

10. मराठी नाटके व मूळ नाट्यकृती यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | आंधळ्यांची शाळा | i. | बॅरट्स ऑफ रिंपल स्ट्रीट |
| b. | दूरचे दिवे | ii. | इडिपस रेक्स |
| c. | सुंदर मी होणार | iii. | आयडियल हस्बंड |
| d. | जयकेतू | iv. | गॉंटलेट |
| | | v. | कॉकेशियन चॉक सर्कल |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | ii | iv | iii |
| (B) | iii | iv | ii | i |
| (C) | ii | v | iii | iv |
| (D) | iv | iii | i | ii |

11. भावकाव्यात्म कादंबरी लिहिण्याचा सर्वात यशस्वी प्रयत्न कोणाचा ?

(A) शरच्चंद्र मुक्तिबोध
(B) बा.सी. मर्ढेकर
(C) पु.शि. रेगे
(D) चिं.त्र्यं. खानोलकर

12. पुढीलपैकी कोणती कादंबरी ऐतिहासिक नाही ?

(A) वज्राघात
(B) कालिकामूर्त्ति
(C) सावळ्या तांडेल
(D) दुर्दैवी रंगू

13. ऐतिहासिक भाषाभ्यासाच्या केंद्रस्थानी कोणती संकल्पना आहे ?

(A) अर्थविचार
(B) आनुवंशिकता
(C) भाषिक परिवर्तन
(D) संदेशनात्मक क्षमता

14. मराठी, हिंदी, गुजराती, बंगाली या भाषा कोणत्या भाषाकुलातील आहेत ?

(A) इंडो-युरोपियन
(B) इंडो-इरानिअन
(C) द्राविड़ी भाषाकुल
(D) ऑस्ट्रो-एशियायी

15. ज्या स्वनांमध्ये स्वनिक साम्य आहे आणि ज्यांचे वितरण पूरक आहे, ते सर्व संच मिळून एक स्वनिम सिद्ध होतो.

(A) संपूर्ण विधान चूक
(B) संपूर्ण विधान बरोबर
(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

16. बडबड, गारगार, लखलख, तुरुतुरु हे शब्द कोणत्या प्रकारचे आहेत ?
(A) अनुकरणवाचक
(B) पूर्णाभ्यस्त
(C) अंशाभ्यस्त
(D) सामासिक

17. सर्व मराठी बोलींच्या शास्त्रीय अध्ययनाचा पाया कोणी घातला ?
(A) अ.का. प्रियोळकर
(B) अशोक केळकर
(C) वि.बा. प्रभुदेसाई
(D) सु.मं. कत्रे

18. उत्क्रमित अनुवाद, आदेशात्मक निष्कर्षण, शुद्धिकारक निष्कर्षण आणि अप्रकट निष्कर्षण या तंत्रांचा उपयोग कशासाठी केला जातो ?
(A) बोलीभाषेच्या विश्लेषणासाठी
(B) बोलीभाषेच्या साहित्यसंकलनासाठी
(C) बोलींच्या व्याकरणसिद्धीसाठी
(D) बोलींच्या ध्वनिव्यवस्थेच्या अभ्यासासाठी

19. 'वक्रोक्तिरेव वैदग्ध्यभङगीभणितिरुच्यते' ही वक्रोक्तीची व्याख्या कोणाची ?
(A) कुन्तक (B) रुय्यक
(C) भोज (D) भामह

20. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा

| | | | |
|---|---|---|---|
| a. | सरस्वतीकण्ठाभरण | i. | उद्‌भट |
| b. | काव्यादर्श | ii. | भामह |
| c. | काव्यालंकारसारसंग्रह | iii. | भोज |
| d. | काव्यालंकार | iv. | दण्डी |
| | | v. | हेमचंद्र |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | v | ii | iii |
| (B) | iii | iv | i | ii |
| (C) | v | iii | iv | i |
| (D) | i | ii | iii | iv |

21. धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च ।
प्रीतिं करोति कीर्तिंच साधुकाव्यनिबन्धनम् ।।
चांगल्या काव्यापासून होणारे वरील लाभ कोणी वर्णिले आहेत ?
(A) मम्मट
(B) विश्वनाथ
(C) भामह
(D) जगन्नाथ

22. भक्तिरस सर्वश्रेष्ठ आहे असे कोणी म्हटले ?
(A) भोज
(B) जगन्नाथ
(C) रूपगोस्वामी
(D) अभिनव गुप्त

23. आनंदवर्धनाने ध्वनिसिद्धान्त मांडला आणि त्याचे खंडन करण्यासाठी महिमभट्टाने 'व्यक्तिविवेक' हा ग्रंथ लिहिला.
(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
(B) संपूर्ण विधान चूक
(C) विधानाचा उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
(D) संपूर्ण विधान बरोबर

24. 'समीक्षा हा ललितकृतीचा न संपणारा शोध असतो', अशा आशयाची समीक्षाविषयक संकल्पना कोणी मांडली आहे ?
(A) गंगाधर गाडगीळ
(B) कुसुमावती देशपांडे
(C) वा.ल. कुलकर्णी
(D) नरहर कुरुंदकर

**25.** पुढीलपैकी कोणते कार्य साहित्यसमीक्षा करीत नाही ?

(A) साहित्यकृतीचा अन्वयार्थ लावणे

(B) साहित्यकृतीच्या गुणवतेचे मूल्यमापन करणे

(C) साहित्यकृतीचे सौंदर्यविशेष सांगणे

(D) साहित्यकृतीचे ऐतिहासिक स्थान नोंदविणे

**26.** समीक्षाक्षेत्रीय कार्य लक्षात घेऊन समीक्षकांचा क्रम लावा :

(A) वा.म. जोशी, वा.ल. कुलकर्णी, रा.श्री. जोग, रा.भा. पाटणकर

(B) रा.श्री. जोग, वा.म. जोशी, रा.भा. पाटणकर, वा.ल. कुलकर्णी

(C) वा.ल. कुलकर्णी, वा.म. जोशी, रा.श्री. जोग, रा.भा. पाटणकर

(D) वा.म. जोशी, रा.श्री. जोग, वा.ल. कुलकर्णी, रा.भा. पाटणकर

**27.** रूपवादी समीक्षादृष्टीचा अवलंब करणारे समीक्षक कोण ?

(A) गो.म. कुलकर्णी

(B) द.ग. गोडसे

(C) ना.सी. फडके

(D) वसंत दावतर

**28.** समीक्षक आणि समीक्षासिद्धान्त यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | वोल्फगँग आयझर | i. | वाचक प्रतिसाद सिद्धान्त |
| b. | अन्तोनिओ ग्रामची | ii. | सांस्कृतिक वर्चस्व (हेजिमनी) |
| c. | विल्यम एम्प्सन | iii. | अनेकार्थता |
| d. | मिखाइल बाख्तीन | iv. | भाषेची संवादात्मकता |
| | | v. | लेखकाचा मृत्यु |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | iv |
| (B) | v | i | ii | iii |
| (C) | v | ii | iii | iv |
| (D) | i | v | iii | iv |

**29.** ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | रूपशोध कवितेचा | i. | निशिकांत मिरजकर |
| b. | कवितेविषयी | ii. | वसंत आबाजी डहाके |
| c. | कवितेचा शोध | iii. | वसंत पाटणकर |
| d. | कवितेची रसतीर्थे | iv. | म.सु. पाटील |
| | | v. | पुरुषोत्तम पाटील |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | ii | iii | i |
| (B) | i | v | iii | iv |
| (C) | iv | iii | ii | i |
| (D) | i | v | iv | iii |

**30.** पुढीलपैकी कोणता गौरवग्रंथ वाङ्मयाच्या प्रकारनिष्ठ अध्यापना विषयीचा आहे ?

(A) प्रा.द.श्री. शेणोलीकर गौरवग्रंथ

(B) प्रा.गो.मा.पवार गौरवग्रंथ

(C) डॉ. दु.का. संत गौरवग्रंथ

(D) डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर गौरवग्रंथ

**31.** कादंबऱ्या आणि त्यांची नाट्यरूपांतरे यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | ‘अंधाराच्या पारंब्या’ | i. | देव चालले |
| b. | ‘महानंदा’ | ii. | सोन्याचा कळस |
| c. | ‘हदपार’ | iii. | राजे मास्तर |
| d. | ‘धावता धोटा’ | iv. | गुंतता हृदय हे |
| | | v. | बॅरिस्टर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | iv |
| (B) | v | iv | iii | ii |
| (C) | v | iv | ii | iii |
| (D) | iv | v | ii | iii |

32. पुढीलपैकी कोणते चरित्र व आत्मचरित्र एकत्रित स्वरूपात सिद्ध झाले आहे ?
(A) काशीबाई कानिटकर
(B) आनंदीबाई जोशी
(C) पार्वतीबाई आठवले
(D) बाया कर्वे

33. पदार्थविज्ञान विषयक संवाद (१८३३) व रसायनशास्त्र विषयक संवाद (१८३७) या दोन ग्रंथांची निर्मिती कोणी केली ?
(A) नारायणशास्त्री जोशी
(B) हरिकेशवजी पाठारे
(C) जॉर्ज जर्विस
(D) बाळशास्त्री जांभेकर

34. अनाथबालिकाश्रमाची स्थापना कोणी केली ?
(A) रमाबाई रानडे
(B) पंडिता रमाबाई
(C) धोंडो केशव कर्वे
(D) सावित्रीबाई फुले

35. पुढीलपैकी कोणते नियतकालिक ख्रिस्ती मिशनऱ्यांना उत्तर देण्यासाठी निघाले नाही ?
(A) चंद्रिका
(B) सर्वसंग्रह
(C) विचारलहरी
(D) सद्धर्म दीपिका

36. पुढील वृत्तपत्रे आणि संपादक यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | जागरूक | i. | श्रीपतराव शिंदे |
| b. | विजयी मराठा | ii. | वा.रा. कोठारी |
| c. | जागृती | iii. | कृष्णराव भालेकर |
| d. | दीनबंधू | iv. | भगवंत पाळेकर |
| | | v. | केशवराव जेधे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | i | iv | iii |
| (B) | ii | iv | v | iii |
| (C) | i | iii | v | iv |
| (D) | i | ii | v | iii |

37. सामाजिक पर्यावरणाचा वाङ्मयीन अभिरुचीवर कोणता परिणाम होत नाही ?
(A) समूहमनाच्या आविष्काराला पोषक वातावरण निर्माण होते.
(B) साहित्य अभिरुचीला विपरीत वळण लागते.
(C) नव्या साहित्य संप्रदायांची निर्मितीशक्य होते.
(D) अभिरुची स्वातंत्र्याची जाणीव उत्पन्न होते.

38. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण करणारा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता ?
(A) लेखकावरील वैचारिक प्रभाव
(B) समकालीन सांस्कृतिक वातावरण
(C) वाङ्मयीन पर्यावरण
(D) आनुवंशिकता

39. साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करणे म्हणजे काय ?
(A) साहित्यकृतीतील सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण
(B) आर्थिक-राजकीय परिवर्तनाची चिकित्सा
(C) साहित्यातील संप्रदायाचा शोध
(D) सांस्कृतिक जीवनाचा मागोवा.

40. वृत्तपत्रीय सदर लेखनातून सिद्ध झालेली पुस्तके व त्यांचे लेखक यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | गंगाजळी | i. | रवींद्र पिंगे |
| b. | चौफेर | ii. | विजय तेंडुलकर |
| c. | रातराणी | iii. | श्री. बा. जोशी |
| d. | शतपावली | iv. | माधव गडकरी |
| | | v. | गोविंद तळवलकर |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | v | ii | i | iv |
| (B) | ii | iii | i | v |
| (C) | iii | iv | ii | i |
| (D) | i | ii | iv | v |

**41.** म. जोतीराव फुले यांच्या दृष्टीने सामाजिक न्याय हे आदर्श समाजाचे पायाभूत मूल्य होते, तर आगरकरांनी विवेकशीलता हे प्राथमिक मूल्य मानले.

(A) विधान संपूर्ण चूक

(B) विधान संपूर्ण बरोबर

(C) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

**42.** पुढील उद्‌गार कोणी काढले आहेत ?
"धर्मवेडाची नांगी ठेचू शकेल असे एकच बळ आहे, ते म्हणजे विज्ञानबळ !"

(A) लोकहितवादी

(B) म. जोतीराव फुले

(C) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(D) विनायक दामोदर सावरकर

**43.** देवदासी, मुरळी यांच्या चालीला आळा घालण्यासाठी १९११ मध्ये मुंबईत 'मुरळी प्रतिबंधक परिषद' कोणी भरवली ?

(A) भाऊराव पाटील

(B) विठ्ठल रामजी शिंदे

(C) म. जोतीराव फुले

(D) महाराजा सयाजीराव गायकवाड

**44.** मराठीच्या संदर्भात भाषाशुद्धीची चळवळ करणाऱ्या प्रमुख व्यक्ती कोणत्या ?

(A) माधवराव पटवर्धन आणि वि.दा. सावरकर

(B) कृष्णराव मराठे आणि प्र.के. अत्रे

(C) श्री. व्यं. केतकर आणि श्री. के. क्षीरसागर

(D) शं.गो. तुळपुळे आणि अशोक केळकर

**45.** 'छंद' या नियतकालिकाचे संपादक कोण होते ?

(A) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(B) पु.आ. चित्रे

(C) पु.शि. रेगे

(D) का.र. मित्र

**46.** नियतकालिकातील सदरलेखनातून सिद्ध झालेली पुस्तके व लेखक यांच्या जोड्या लावा.

| | |
|---|---|
| a. एकपानी | i. जयवंत दळवी |
| b. अलाणेफलाणे | ii. अनंत भावे |
| c. लेणी | iii. गोविंद तळवलकर |
| d. वडापाव | iv. शांता शेळके |
| | v. गंगाधर पानतावणे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | iii | iv | v |
| (B) | iv | i | v | ii |
| (C) | ii | i | iv | iii |
| (D) | iii | ii | i | iv |

**47.** पुढील काव्यपंक्ती कोणत्या काव्यातील आहे ?
"दिले हिरण्मय
हाती मृण्मय
हा हत विनिमय"

(A) सलाम

(B) योगभ्रष्ट

(C) हरपले श्रेय

(D) पृथ्वीचे प्रेमगीत

**48.** "या देहभोगाच्या दलदलीतून उठून उभा राहिला एक माणूस । " हे उद्‌गार कोणत्या साहित्यकृतीतील आहेत ?

(A) एकच प्याला

(B) नटसम्राट

(C) बळी

(D) रणांगण

**49.** पुढील साहित्यकृतींचा कालानुसार क्रम लावा.

(A) धग, किडलेली माणसे, औदुंबर, स्मृतिचित्रे,

(B) किडलेली माणसे, औदुंबर, स्मृतिचित्रे, धग,

(C) धग, औदुंबर, स्मृतिचित्रे, किडलेली माणसे,

(D) औदुंबर, स्मृतिचित्रे, किडलेली माणसे, धग,

**50.** व्यक्तिरेखा आणि साहित्यकृती यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | चक्रधर | i. | वज्राघात |
| b. | मेहेरजान | ii. | रणांगण |
| c. | नाना सिरूर | iii. | बळी |
| d. | आबा | iv. | ताम्रपट |
| | | v. | कोसला |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | ii | i | iv | iii |
| (B) | v | iv | iii | i |
| (C) | ii | iii | iv | v |
| (D) | i | ii | iv | iii |

**51.** सांस्कृतिक मानवशास्त्र आणि वाङ्मयशाखेच्या अभ्यासकांच्या लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती मध्ये, उद्दिष्टांमध्येही मूलभूत फरक करणे आवश्यकच असते, पण, असा फरक मराठीतील लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी गांभीर्याने केलेला आढळत नाही.

(A) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान चुकीचे

(D) संपूर्ण विधान बरोबर

**52.** लोककथेच्या निर्मितीबाबत 'भारत मूलक सिद्धांत' कुणी मांडला ?

(A) थिओडोर बेनफे

(B) अड्रँयू लँग

(C) इमॅन्युअल कौअकिन

(D) विल्यम बॅस्कम

**53.** 'लौकिक पुराण' परंपरेसाठी 'लोकसाहित्य' ही संज्ञा सर्वप्रथम कुणी वापरली ?

(A) जॉन अब्रे

(B) बेन्जामिन बोटकीन

(C) विल्यम थॉमस

(D) अलेक्झांडर क्राप

**54.** पुढील स्त्रीगीतातून कोणता अर्थ सूचित होतो ?

कारल्याचा वेल लाव गं सुने
मग जा आपुल्या माहेरा
कारल्याचा वेल लावला वं सासूबाई
आतातरी जाऊ का माहेरा
कारल्याला पानं येऊ दे गं सुने
मग जा आपुल्या माहेरा
कारल्याला पानं आली हो सासूबाई
आतातरी जाऊ का माहेरा

(A) सासू सुनेचा संवाद

(B) सासूचा सासुरवास आणि सुनेची अगतिकता

(C) वेलीच्यां वाढीचे वर्णन

(D) सुनेच्या समृद्धीसाठी केलेली प्रार्थना

**55.** जोड्या लावा : लोककथासंग्रह व कथासंग्राहक

| | | | |
|---|---|---|---|
| a. | बृहतकथा श्लोकसंग्रह | i. | क्षेमेंद्र |
| b. | बृहतकथा मंजरी | ii. | बुद्धघोष |
| c. | पंचतंत्र | iii. | वररुचि |
| d. | जातक कथा | iv. | विष्णु शर्मा |
| | | v. | बुद्धस्वामी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | v |
| (B) | iv | iii | i | ii |
| (C) | v | i | iv | ii |
| (D) | ii | iv | v | iv |

**56.** 'तुलना करणे' ही तौलनिक साहित्याभ्यासामागील मूलभूत संकल्पना आहे आणि या संकल्पनेची बहुविध अंगे या अभ्यासाला अर्थपूर्णता प्राप्त करून देतात.

(A) वरील विधान पूर्णत: बरोबर आहे.

(B) वरील विधान पूर्णत: चुकीचे आहे.

(C) वरील विधानातील पूर्वार्ध बरोबर आहे, पण उत्तरार्ध चुकीचा आहे.

(D) वरील विधानातील उत्तरार्ध बरोबर आहे, पण पूर्वार्ध चुकीचा आहे.

**57.** भाषांतरित साहित्यकृती कोणत्या प्रकारचे कार्य करीत नाही ?

(A) लक्ष्य भाषेचे संवर्धन व समृद्धी साधते.

(B) भाषिक श्रेष्ठ-कनिष्ठत्व सिद्ध करते.

(C) अन्य संस्कृतींचा परिचय करून देते.

(D) अन्य भाषेतील साहित्यकृतीचा परिचय करून देते.

**58.** 'भारतीय साहित्य' या संकल्पनेचा विकास घडविणाऱ्यांमध्ये पुढीलपैकी कोणत्या लेखकाचा अंतर्भाव होऊ शकेल ?

(A) जॉन स्टुअर्ट मिल

(B) मॅक्समुल्लर

(C) मॅथ्यू आर्नोल्ड

(D) हर्बर्ट स्पेन्सर

**59.** पुढीलपैकी कोणती साहित्यकृती गुजरातीतून मराठीत अनुवादित झाली आहे ?

(A) 'क्षुद्रदेवता'

(B) 'काठ'

(C) 'सव्यसाची'

(D) 'सात पाऊले आकाशी'

**60.** भाषांतरित साहित्यकृती व मूळ साहित्यकृती यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | 'विकार विलसित' | i. | 'हॅम्लेट' |
| b. | 'झुंझार राव' | ii. | 'ऑथेल्लो' |
| c. | 'आंधळ्याची शाळा' | iii. | 'गॉण्टलेट' |
| d. | 'त्राटिका' | iv. | 'टेमिंग ऑफ द श्रू' |
| | | v. | 'थ्री पेनी ऑपेरा' |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | i | ii | iii | iv |
| (B) | ii | i | iv | v |
| (C) | ii | iii | i | iv |
| (D) | ii | i | v | iv |

**61.** "सर्वच जीवनक्षेत्रांत स्त्रीच्या वाट्याला कायमच दुय्यमत्व आले आहे या वस्तुस्थितीचा बोध करून देणे म्हणजे स्त्रीवादी साहित्याभ्यास; मात्र त्याचबरोबर स्त्रियांच्या साहित्यनिर्मितीची वाङ्मयीन चिकित्सा हा स्त्रीवादी साहित्याभ्यासाचा गाभा आहे हे विसरता येत नाही."

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

**62.** स्त्रीवादी साहित्यसमीक्षा कोणत्या निकषाचा उपयोग करत नाही ?

(A) स्त्रियांच्या शोषणाची मीमांसा

(B) वाङ्मयीन महात्मता

(C) स्त्रीपुरुष नातेसंबंधातील समानता

(D) स्त्रियांच्या जीवनपद्धतीचे चित्रण

**63.** पुढीलपैकी मल्लिका अमरशेख यांचा कवितासंग्रह कोणता ?

(A) व्यतीत

(B) वाळूचा प्रियकर

(C) तोच चंद्रमा

(D) आकाशवेडी

**64.** पुढील लेखिकांची नावे कालक्रमानुसार लिहा.

गिरिजाबाई केळकर, कुसुमावती देशपांडे, काशीबाई कानिटकर, कमलाबाई टिळक,

(A) गिरिजाबाई केळकर, कमलाबाई टिळक, काशीबाई कानिटकर, कुसुमावती देशपांडे

(B) कुसुमावती देशपांडे, गिरिजाबाई केळकर, कमलाबाई टिळक, काशीबाई कानिटकर

(C) काशीबाई कानिटकर, कमलाबाई टिळक, गिरिजाबाई केळकर, कुसुमावती देशपांडे

(D) काशीबाई कानिटकर, गिरिजाबाई केळकर, कमलाबाई टिळक, कुसुमावती देशपांडे

**65.** कादंबरी व कादंबरीकार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | सेतू | i. | विभावरी शिरूरकर |
| b. | शबरी | ii. | ज्योत्सना देवधर |
| c. | थांग | iii. | आशा बगे |
| d. | कुँवरनी | iv. | गौरी देशपांडे |
| | | v. | सानिया |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | v | iii | ii |
| (B) | ii | iii | v | i |
| (C) | iii | i | iv | ii |
| (D) | v | iv | ii | i |

**66.** पुढीलपैकी व्यक्तिचित्र प्रधानता हे कोणत्या ग्रामीण लेखकाचे वैशिष्टय आहे ?

(A) आनंद यादव

(B) व्यंकटेश माडगूळकर

(C) ग.ल. ठोकळ

(D) उद्धव शेळके

**67.** ‘कृषि-संस्कृती हा ग्रामीण साहित्याचा गाभा आहे;
त्याचप्रमाणे ग्रामीण परिसरातील निसर्ग हाही ग्रामीण साहित्यनिर्मितीचा विशेष आहे.’

(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक.

(B) विधानाचा उत्तरार्ध बरोबर पूर्वार्ध चूक.

(C) संपूर्ण विधान चूक.

(D) संपूर्ण विधान बरोबर

**68.** पुढील साहित्यकृती कालक्रमाने लिहा.

(A) बारी, नागीण, कागूद आणि सावली, सराई

(B) नागीण, बारी, सराई, कागूद आणि सावली

(C) सराई, कागूद आणि सावली, बारी, नागीण

(D) सराई, बारी, नागीण, कागूद आणि सावली

**69.** पुढीलपैकी कोणता घटक ग्रामीण साहित्यातील सामाजिकतेचा निदर्शक नाही ?

(A) कृषीजीवनाशी संबंधित जीवनचित्रण

(B) ग्रामीण भाषा

(C) ग्रामीण परिसरातील सत्ता स्पर्धा

(D) ग्रामीण साहित्यनिर्मितीमागील प्रेरणादायी नेतृत्व.

**70.** ग्रामीण लेखक व ग्रामीण साहित्यकृती यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | आनंद यादव | i. | सावट |
| b. | भास्कर चंदनशीव | ii. | टेंभा |
| c. | रा.रं. बोराडे | iii. | मरणकळा |
| d. | ग.ल. ठोकळ | iv. | हिरवे जग |
| | | v. | पीकपाणी |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iv | iii | i | ii |
| (B) | v | i | ii | i |
| (C) | iv | v | ii | iii |
| (D) | ii | iv | iii | v |

**71.** पुढीलपैकी कोणता सामाजिक घटक निर्विवादपणे दलित साहित्याशीच निगडित आहे ?

(A) सर्वधर्मसमभावाची मागणी

(B) स्त्रियांवरील विविध बंधनांचे चित्रण

(C) अस्पृश्यता आणि सामाजिक विषमतेची वेदना

(D) शिक्षणाचा अभाव आणि दारिध्र

**72.** 'युगयात्रा' या नाटकाचे लेखक कोण आहेत

(A) म.भि. चिटणीस

(B) नामदेव व्हटकर

(C) दत्ता भगत

(D) भालचंद्र फडके

**73.** "ही प्रतिभेची शेतं कुणाच्या आज्ञेवरून नांगरली जात आहेत ?" ही काव्यपंक्ती कोणी लिहिली आहे ?

(A) अर्जुन डांगळे

(B) नामदेव ढसाळ

(C) यशवंत मनोहर

(D) भुजंग मेश्राम

**74.** 'युवक प्रवर्तक' या कादंबरीचे लेखन कोणी केले आहे ?

(A) नामदेव कांबळे

(B) अण्णाभाऊ साठे

(C) हरिभाऊ पगारे

(D) केशव मेश्राम

**75.** दलित साहित्याच्या स्वरूपाचे सर्वांगीण संशोधन व परीक्षण करणारे ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | साहित्य : दलित आणि ललित | i. | रा.ग. जाधव |
| b. | दलित वाङ्मय : प्रेरणा आणि प्रवृत्ती | ii. | गो.ग. कुलकर्णी |
| c. | दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह | iii. | शंकरराव खरात |
| d. | निळी पहाट : मराठी दलित साहित्याची मीमांसा | iv. | भालचंद्र फडके |
| | | v. | गंगाधर पानतावणे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (A) | iii | ii | v | iv |
| (B) | iv | ii | iii | v |
| (C) | ii | iii | i | iv |
| (D) | ii | iii | iv | i |

**Space For Rough Work**